**- घोषणा -**

क्रमांक- एमआयएस-०६१६/सीआर ५५/२०१६/तीन

## आयोगामार्फत आयोजित परीक्षांमध्ये काही उमेदवारांकडून होत असलेल्या गैरप्रकाराच्या प्रयत्नाबाबत

लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या स्पर्धा परीक्षांमध्ये बनावट प्रोफाईलद्वारे किंवा आधुनिक इलेक्ट्रॉनिक साधनां आधारे तोतयेगिरी करणे, कॉपी करणे किंवा गैरप्रकार करणे, असे प्रयत्न होत असल्याचे आढळले आहे. आयोगाने याची गंभीर दखल घेतली असून त्यासंबंधात पोलीस केसेस दाखल केल्या आहेत. प्रशासकीय कारवाई करणे व चौकशी/तपास निष्कर्षा आधारे फौजदारी कारवाई बरोबरच उमेदवारांना आयोगाच्या परीक्षेस प्रतिबंधित करणे/काळ्या यादीत टाकणे अशा प्रकारची कारवाई करण्यात येत आहे.

**२.**आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षा/शारीरिक चाचणीच्या वेळी डिजिटल डायरी, मोबाईल फोन, पेजर, अत्याधुनिक कॅमेरा इत्यादी सारखी दूरसंचार साधने अथवा दूरसंचारासाठी वापरण्यात येणारी इतर कोणतीही साधने, परवानगी नसलेली पुस्तके, पेपर्स इत्यादी प्रकारचे अनधिकृत साहित्य स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. आयोगाने परवानगी नाकारलेले कोणतेही साहित्य अथवा किंमती वस्तू यासह परीक्षा कक्षात उमेदवाराला प्रवेश देण्यात येणार नाही. यास्तव, परीक्षेस येताना असे साहित्य बरोबर आणू नये. असे साहित्य आणल्यास त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवारावर राहील.

**३.**आयोगाने परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्या वेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशव्दाराबाहेरच ठेवावे लागेल. अशा साधन/साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस आयोग, जिल्हा प्रशासन किंवा संबंधित शाळा व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

**४.**वरील सूचनांचे पालन न करणाऱ्या उमेदवारांवर व त्याला मदत करणाऱ्या सर्व व्यक्तींना, आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार, संबंधित परीक्षेची उमेदवारी रद्द करुन आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षा व निवडीकरिता कायमस्वरुपी प्रतिरोधित [Debar] करण्यात येईल. तसेच संबंधित कायदे/नियमातील तरतुदीनुसार कडक कारवाई करण्यात येईल.

**५.**आयोगास अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वत:ची सत्य माहिती देणे, तसेच स्वत:चाच फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे आवश्यक आहे. तथापि, इतरांना मदत करण्याच्या हेतूने बनावट प्रोफाईलच्या आधारे काही उमेदवार परीक्षेस प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे. अशा उमेदवारांची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. आयोगाच्या परीक्षेस अर्ज करणाऱ्या उमेदवाराने कोणत्याही टप्प्यावर अर्जामध्ये केलेल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ आयोगाच्या सूचनांनुसार कागदोपत्री पुरावा सादर करणे आवश्यक आहे. तो न सादर केल्यास आयोगाची फसवणूक करण्याच्या दृष्टीने खोटी माहिती देऊन, आयोगास अर्ज सादर केला, असे समजण्यात येईल व त्यानुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

ठिकाण- मुंबई
दिनांक - १९ सप्टेंबर,२०१६

प्रदीप कुमार
सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.